International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 4.082
Vol.3 No.6 July – Aug 2016

# भारतीय समाजातील गरिबीवर उपाय योजना

**प्रा. शरद नामदेव बोरवडेकर**

*समाजशास्त्र विभाग*

*गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर*

**प्रस्तावना:**

भारतातील दारिद्र्याला इथली समाजरचना, परंपरागत दृष्टिकोण, मूल्य व्यवस्था, जातीयता, बलुतेदारी पध्दत, बशिलेबाजी लाचलुचपत, अंधश्रद्धा, इ. ही जबाबदार आहे. या कारणांमुळे भारतीय समाजाचा विकासाकडे पाहण्याचा प्रागतिक दृष्टीकोण आढळत नाही. वरील कारणांमुळे प्रादेशिक असमतोल, निकृष्ट राहणीमान, नवीन तंत्रज्ञान, श्रीमंत व्यक्तींचा राजकीय प्रभाव इ. मुळे दारिद्र्य वाढते.

स्वातंत्र्यानंतर विशेषतः १९७० नंतर सरकारने दारिद्र्य निर्मूलनाचे अनेक उपाय योजले. पण या कार्यक्रमांचा लाभ खऱ्या, गरजू गरीबांपर्यंत पोहतच नाही. या कार्यक्रमाचे व्यवस्थापन व अंमलबजावणीमध्ये अनेक त्रुटी होत्या, तसाच भ्रष्टाचारही होता. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलनाच्या योजना शासनदरबारी फक्त कागदावरच राबविल्या गेल्या. परिणामी ग्रामीण समाजातील दारिद्र्य वाढले. भारतातील रा समाजातील गरीबी ही समस्या गंभीर व व्यापक असून तिचे गांभीर्य कमी करण्यासाठी विविध दिशेने व पातळीवर उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे. या उपाययोजनांची वर्गवारी खालीलप्रमाणे देता येईल.

**उपाययोजना:**

**(अ) विशेष उपाय योजना:**

चवथ्या पंचवार्षिक योजनेत सीमान्त शेतकरी व शेतमजूर विकास एजन्सी, (Marginal farmers and Agricultural development Agency. MFAL)

(१) अल्पभूधारक विकास एजन्सी (Small farmers development Agency)

(२) अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम Drought prone Area programme सुरू करण्यात आले. सहाव्या पंचवार्षिक योजनेत हे सर्व कार्यक्रम एकत्रित करून एकात्म ग्रामीण विकास कार्यक्रम सहाव्या पंचवार्षिक योजनेत हाती घेण्यात आले. (Integrator Rural development programme) या कार्यक्रमांतर्गत सातव्या योजनेत १ कोटी ८२ लाख कुटुंबांना विविध फायदे उपलब्ध करून देण्यात आले. त्यावर ८६८८

कोटी ३५ लाख रूपये खर्च करण्यात आले. त्यामुळे ग्रामीण समाजातील असंख्य लोकांना वेतन रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध झाला. लहान सीमान्त शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, ग्रामीण कारागीरांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. मृदसंधारण, कुक्कुटपालन, पशुसंवर्धन, मधमाशांपालन, रेशीम उत्पादन, त्पादन, मत्स्त्स्य शेती, फलोत्पादन, व्यापार व सेवा असे किती तरी उपक्रम या कार्यक्रमांतर्गत सुरू करण्यात आले.

(३) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्षम (National Rural Employment programme NREP) १९७७ मध्ये कामाबद्दल अन्न Work for food programme हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. रस्ते, पूलबांधणी, जलसिंचन योजना सुरू करून रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. कामाच्या मोबदल्यात अंशतः किंवा पूर्ण अन्नधान्य देण्यात आले. श्रमशक्तीतून उत्पादक मालमत्ता निर्माण करण्याचे प्रयत्न याच कार्यक्रमात अंतर्भूत होते. १९८८-८९ अखेर या कार्यक्रमावर २९४० कोटी रूपये खर्च करून १४७७ दशलक्ष मानवी दिवस रोजगार निर्माण करण्यात आला.

(४) ग्रामीण रोजगार धडक कार्यक्रम (Crash Programme for rural unemployment) प्रत्येक कुटुंबातील किमान एका व्यक्तीला तरी रोजगार देण्यात यावा या उद्देशाने हा कार्यक्रम १९७१ मध्ये सुरू करण्यात आला. हा कार्यक्रम चवथ्या पंचवार्षिक योजनेपुरताच मर्यादित होता.

(५) ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम १५ ऑगस्ट १९८३ ला हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. भूमिहीन कुटुंबातील एका व्यक्तीला शंभर दिवस निश्चित काम मिळवून देण्याचे उद्दिष्ट या कार्यक्रमात होते. त्यानुसार २४१२ कोटी रुपये खर्च करण्यात येऊन ११३४०.४ दशलक्ष मानवी श्रमदिवस रोजगार उपलब्ध करून देण्यात आला.

(६) जवाहर रोजगार योजना १ एप्रिल १९८९ रोजी हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. वरील दोन्ही कार्यक्रम यात विलीन करण्यात आले. या कार्यक्रमावर १९९३-९४ पर्यंत ११०२२ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

या शिवाय संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी भूमिहीन शेतमजूर योजना, इंदिरा आवास योजना, महाराष्ट्राची रोजगार हमी योजना, ग्रामीण भागातील स्त्रिया व मुलांच्या विकास योजना, ग्रामीण तरूणांसाठी स्वयंरोजगार योजना (TRYSEM) इ. कार्यक्रम राबविले जातात. अनुसूचित जमातीसाठी सुद्धा सरकारने आदिवासी उपाययोजना राबवून दारिद्र्य दूर करण्याचा प्रयत्न केला आहे.

**(ब) मालमत्ता विषयक उपाययोजना मालमत्तेतील विषमता कमी करण्यासाठी**

(१) कसेल त्याची जमीन या तत्वावर जमीनदारीचे उच्चाटन

(२) भूधारणेवर कमाल मर्यादा

(३) कुळांना संरक्षण

(४) नागरी मालमत्तेवर कमाल मर्यादा इ. उपाय योजले आहेत.

**(क) उत्पन्नविषयक उपाययोजना:**

गरीबांचे उत्पन्न वाढावे यासाठी किमान वेतन कायदे, राज्य कामगार विमा, भविष्यनिर्वाह निधी. इ. उपाययोजना केल्या आहेत. श्रीमंतावर चढ्या दानी कर आकारून त्यांचे उत्पत्र मर्यादित करण्याचा प्रयत्न केला. मात्र उत्पन्नविषयक देशव्यापी धोरण आखून त्याची अंमलबजावणी करणे ही महत्वाची उपाययोजना अजूनही सरकारने स्वीकारलेली नाही.

**(ड) मूलगामी उपाय योजना:**

भारतातील दारिद्र्याचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी काही मूलगामी योजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक ठरते. त्यासाठी संपूर्ण करव्यवस्थेची पुनर्रचना, भाववाढ रोखणे, लाचलुचपत व भ्रष्टाचाराला आळा घालणे, काळ्या पैशाचे उच्चाटन करणे, गरीबांच्या किमान गरजांची पूर्तता झाल्याशिवाय चैनीच्या वस्तूंच्या उत्पादनावर मर्यादा आणणे, रोजगाराभिमुख नियोजन करणे या सारखे उपाय योजून त्याची अंमलबजावणी करण्याचे धैर्य शासनाने दाखविले पाहिजे. त्यासाठी समाजाने आग्रह धरून स्वतःचा या योजनातील सहभाग दिला पाहिजे. सर्वात महत्वाचा मूलगामी उपाय म्हणजे वाढत्या लोकसंख्येचे कठोरपणे नियंत्रण केले पाहिजे. कारण भारताच्या दारिद्र्याचे मूळ त्यातच आहे.

वर विचार केलेल्या उपाययोजनांचा साकल्याने आढावा घेतला तर त्या फारशा परिणामकारक झाल्या आहेत असे म्हणणे धाष्टर्याचे ठरेल. दारिद्र्य हा भारताचा जुना मुरलेला रोग आहे. (Chronic disease) आजार जितका जुनाट, तितके औषधही परिणामधारक आणि रोगाच्या मुळाशी पोचणारे असावे लागते. त्यासाठी या उपाययोजनांची कठोर व प्रामाणिकपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

**सारांश :**

दारिद्र्य ही भारतीय समाजापुढील व्यापक व गंभीर समस्या असून तिची मुळे ब्रिटिशांच्या राजवटीत आहेत. दारिद्र्याची संकल्पना मुख्यतः किमान आवश्यक गरजा भागविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पैशाच्या अभावाच्या संदर्भात करतात. दारिद्र्य ही सापेक्ष तशीच निरपेक्ष संकल्पना आहे. १९९२ साली दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या ३५.५ कोटी इतकी होती. भारताच्या दारिद्र्याचा समस्येला जबाबदार असणाऱ्या कारणांमध्ये वैयक्तिक कारणे, दैववादी दृष्टिकोण दारिद्र्य संस्कृती, आर्थिक कारणे वाढती लोकसंख्या, बेकारी, सामाजिक कारणे इ. महत्वाची आहेत. दारिद्र्यावरील उपाययोजनांमध्ये मुख्यतः विशेष उपाय योजना, मालमत्ताविषयक उपाययोजना, उत्पन्नविषयक उपाययोजना आणि मूलगामी योजनांचा समावेश होतो.

**संदर्भ :**


१) खडसे भा.की., भारतीय समाजातील समस्या, मंगेश - नागपूर

२) देवधर लीना, मुंबई

३) गोडबोले अरविंद स : वृद्ध आणि त्यांचे प्रश्न पॉप्युलर मुंबई.

४) लोकसत्ता पुणे – ता. 24.3.1997

५) गाडगीळ न. वि. शिखांचा इतिहास

६) अवचट, अनिल गर्द, श्री विद्याशंकर, पुणे